अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 12 मार्च 2026 | वर्ष 11 वे | अंक 30 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# भाजप नगरसेवकांनी केलेले आरोप दिशाभूल करणारे

## पत्र परिषदेत सत्ताधारी पक्षाकडून आरोपांचे खंडण, ग्रीन जिमसाठी १० लाख तर स्वच्छतेसाठी ३ कोटींची तरतूद

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पाबाबत भाजप नगरसेवकांनी केलेले आरोप दिशाभूल करणारे असून त्याद्वारे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप नगरपरिषदेतील काँग्रेस सत्ताधाऱ्यांनी केला आहे. शहराच्या सर्वांगीण विकासाचा विचार करूनच अर्थसंकल्प तयार करण्यात आला असून विरोधकांनी चुकीची आकडेवारी देऊन



जनतेची दिशाभूल करू नये, असे आवाहन सत्ताधाऱ्यांनी केले.

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना नगराध्यक्ष योगेश मिसार यांनी सांगितले की, शहराच्या विकासासाठी आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सोयीसुविधांना प्राधान्य देत अर्थसंकल्पाची आखणी करण्यात आली आहे. मात्र विरोधी पक्ष असलेल्या भाजपकडून अर्थसंकल्पातील काही बाबींचा विपर्यास करून नागरिकांसमोर चुकीचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

भाजप नगरसेवकांनी ग्रीन जिम व खेळाच्या मैदानांच्या दुरुस्तीसाठी केवळ ३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आल्याचा दावा केला होता. तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्था व नाल्यांच्या साफसफाईसाठी १ कोटी ५० लाख रुपयेच ठेवण्यात आल्याचे सांगितले होते. मात्र ही माहिती पूर्णपणे चुकीची असल्याचे सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट केले.

नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पात ग्रीन जिम आणि खेळाच्या मैदानांच्या दुरुस्तीसाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शहरातील युवक व मुलांना चांगल्या क्रीडा सुविधा मिळाव्यात आणि नागरिकांनी आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारावी, या उद्देशाने हा निधी ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि नाल्यांच्या साफसफाईसाठी तब्बल ३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# लग्नाळू तरुणांच्या भवितव्यावर टांगती तलवार, मुलींचा होकार येईना!

## लग्नाविना पस्तिशी ओलांडली, सामाजिक संकटाची ‘अलार्म बेल’ वाजली

ब्रम्हपुरी/का.प्र.

देशाची लोकसंख्या १५० कोटींच्या उंबरठ्यावर असताना, दुसरीकडे समाजाचा कणा असलेला ‘तरुण वर्ग’ मात्र एका भीषण चक्रव्यूहात अडकला आहे. वाढती बेरोजगारी, शेतीतील अनिश्चितता आणि बदलती जीवनशैली यामुळे पस्तिशी ओलांडलेल्या अविवाहित तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ही केवळ कौटुंबिक समस्या नसून, एका मोठ्या सामाजिक विनाशाची नांदी ठरत असल्याचे भयावह वास्तव समोर आले आहे.

ग्रामीण भागातील तरुणांच्या लग्नाचा प्रश्न थेट शेतीशी जोडला गेला आहे. खते, बियाणे आणि औषधांचे बेसुमार भाव वाढले असताना शेतीमालाला मात्र हमीभाव मिळत नाही. निसर्गाचा लहरीपणा आणि सरकारच्या आयात-निर्यात धोरणामुळे शेती आता 'तोट्याचा व्यवसाय' झाली आहे. ज्या तरुणाकडे उत्पन्नाचे साधन म्हणून केवळ शेती आहे, त्याला मुलगी देण्यास कुणीही तयार नसल्याने हजारो तरुण विवाहाच्या नैसर्गिक हक्कापासून वंचित राहत आहेत.

महाविद्यालयांमध्ये ‘सक्षम आणि परिपक्व’ तरुण घडवण्याऐवजी केवळ पदव्या वाटल्या जात आहेत. विद्यार्थी महाविद्यालयात न जाताच पदवीधर होत असल्याने, त्यांच्यात व्यावहारिक कौशल्ये आणि आत्मविश्वासाचा अभाव दिसत आहे. खासगीकरणामुळे सरकारी नोकऱ्या घटल्या असून, खासगी क्षेत्रात 'वेठबिगारी' सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. गावातील हुशार तरुण शहराकडे धाव घेत आहेत, जिथे त्यांचा वापर केवळ 'स्वस्त मनुष्यबळ' म्हणून केला जात आहे. दुसरीकडे, शहरात स्थायिक झालेल्या तरुणांचे आयुष्य फ्लॅट, गाडीचे हप्ते आणि मुलांच्या शिक्षणाच्या खर्चात अडकले आहे. यामुळे शहरी भागात कौटुंबिक हिंसाचार आणि घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड वाढले असून, सुखी संसाराचे स्वप्न धुळीला मिळत आहे.

राजसत्ता, अर्थसत्ता, शिक्षणसत्ता, मीडिया आणि धर्मसत्ता ही पाच महत्त्वाची केंद्रे सध्या केवळ भांडवलदारांच्या

(उर्वरित पान क्र. ५ वर)

# दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

## दोन दिवसांत दोन मुली बेपत्ता झाल्यामुळे तालुक्यात भीतीचे वातावरण

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरात गेल्या दोन दिवसांत दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या दोन्ही मुलींना कुणीतरी फूस लावून पळवून नेल्याचा संशय पालकांनी व्यक्त केला असून, ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. पहिली घटना ७ मार्च रोजी घडली. शहरातील एका खासगी कोचिंग सेंटरमध्ये शिकणारी १६ वर्षीय मुलगी नेहमीप्रमाणे दुपारी २ वाजता क्लासला गेली होती. तिचे वडील तिला स्वतः सोडून आले होते. मात्र, संध्याकाळी ६:३० वाजले तरी मुलगी घरी परतली नाही. चिंताग्रस्त वडिलांनी क्लासच्या शिक्षकांशी संपर्क साधला असता, ती क्लास संपवून वेळेवर निघाल्याचे सांगण्यात आले. नातेवाईक आणि मित्रमैत्रिणींकडे शोध घेऊनही काहीच पत्ता लागला नाही. अखेर, गावातीलच एका १९ वर्षीय

(उर्वरित पान क्र. ६ वर)




## संपादकिय...

# युध्दाचे आर्थिक आव्हान

जागतिक राजकारणातील प्रत्येक युद्धाचा सर्वाधिक परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो, हे इतिहासाने पुन्हा पुन्हा सिद्ध केले आहे. आज पश्चिम आशियात पेटलेले इराण – इस्त्रायल युद्ध आणि त्यात गुंतलेली अमेरिका, इस्त्रायल आणि इराण ही राष्ट्रे केवळ भू-राजकीय संघर्ष करत नाहीत, तर जागतिक अर्थव्यवस्थेच्या नसा पकडून ठेवणाऱ्या ऊर्जा बाजारालाही हादरा देत आहेत. या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतींनी पुन्हा १०० डॉलरचा टप्पा ओलांडला असून काही बाजारात त्या ११५ डॉलरच्या पुढे गेल्या आहेत. या युद्धाचे जगावर सावट पडणार होते, परंतु आता ते दिसून येऊ लागले आहेत. ऊर्जेवर आधारित आधुनिक जगात तेलाच्या किमतीत झालेली ही उसळी म्हणजे केवळ आकड्यांचा चढउतार नाही; तर ती जागतिक महागाई, आर्थिक मंदी, शेअर बाजारातील अस्थिरता आणि सामाजिक असंतोष यांची साखळी प्रतिक्रिया निर्माण करणारी घटना ठरू शकते. विशेषत: दक्षिण आशियातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत देशांसाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत आहे.

या संकटाचे केंद्र आहे होमुर्झचा पट्टा. जगातील सुमारे २० टक्के तेल वाहतूक या सामुद्रधुनीतून होते. त्यामुळे या मार्गावर कोणतीही अडथळा निर्माण झाली तर त्याचा परिणाम जगभरातील ऊर्जा पुरवठ्यावर होतो. इराणने या मार्गावर नाकाबंदी करण्याची धमकी दिल्याने तेल बाजारात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पश्चिम आशियातील कुवेत, कतार आणि इतर तेल उत्पादक देशांनीही परिस्थिती गंभीर झाल्यास पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो, अशी संकेत दिल्याने बाजार अधिकच अस्थिर झाला आहे. परिणामी ब्रेंट क्रूड, वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट आणि मुर्बन क्रूडच्या किमतींमध्ये विक्रमी वाढ झाली. ऊर्जा हा आधुनिक अर्थव्यवस्थेचा प्राणवायू आहे. त्यामुळे तेलाच्या किमतीतील प्रत्येक वाढ उद्योग, वाहतूक, शेती आणि सामान्य ग्राहकांच्या खर्चावर परिणाम करते. यामुळेच तेलाचा भडका म्हणजे आर्थिक संकटाचा पहिला इशारा मानला जातो.

भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. परंतु ऊर्जा सुरक्षेच्या बाबतीत भारत अजूनही मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. त्यामुळे जागतिक बाजारातील किंमतीतील वाढ भारतासाठी मोठे आव्हान ठरते. तेल महागले की सर्वप्रथम परिणाम होतो तो वाहतूक खर्चावर, पेट्रोल आणि डिझेल महागले की मालवाहतुकीचा खर्च वाढतो. परिणामी अन्नधान्य, भाजीपाला, बांधकाम साहित्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढतात. म्हणजेच महागाईचा दबाव वाढतो. याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होतो. मध्यमवर्ग आणि गरीब वर्गासाठी जीवनावश्यक खर्च वाढतो. सरकारलाही सबसिडी आणि कर धोरणांमध्ये बदल करावे लागतात.

या युद्धाच्या परिणामाचा पहिला धक्का भारताच्या शेअर बाजारालाही बसला आहे. जर तेलाच्या किमती दीर्घकाळ वाढल्या तर उद्योग क्षेत्रावर मोठा दबाव निर्माण होऊ शकतो. यामुळे आर्थिक विकासाचा वेग मंदावण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत भारतासाठी सर्वात महत्त्वाचे आव्हान म्हणजे राजनैतिक संतुलन राखणे. भारताचे पश्चिम आशियातील सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. एकीकडे भारताचे इस्त्रायलशी संरक्षण सहकार्य आहे, तर दुसरीकडे इराण हा ऊर्जा आणि भू-राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा भागीदार आहे. हे युद्ध केवळ मध्य पूर्वेपुरते मर्यादित नाही; त्याची सावली संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर पडत आहे. आणि जर हे युद्ध दीर्घकाळ चालले, तर त्याचा सर्वात मोठा भार सामान्य नागरिकांनाच सहन करावा लागणार आहे.

# 'यश'ची ४० दिवसानंतर मृत्यूशी झुंज संपली

## प्रजासत्ताक दिनी भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रॅक्टरने अपघात

ब्रह्मपुरी/का.प्र.

ज्या दिवशी संपूर्ण देश ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत होता, त्याच दिवशी ब्रह्मपुरीच्या रस्त्यावर भरधाव वेगाने जाणाऱ्या 'मृत्यूच्या दूताने' दोन निष्पाप विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. २६ जानेवारी रोजी पहाटे झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेला १४ वर्षीय यश प्रकाश मेश्राम याची अखेर ४० दिवसांनंतर मृत्यूशी झुंज संपली आहे. दिनांक ६ मार्च २०२६ रोजी उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. ज्यामुळे संपूर्ण ब्रह्मपुरी तालुक्यात संताप आणि शोककळा पसरली आहे.

२६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी पावणे सहाच्या सुमारास, नेवजाबाई हितकारिणी



शाळेचे एनसीसी (NCC) विद्यार्थी यश मेश्राम आणि त्याचा मित्र रोनक नागापुरे (वय १४) हे दोघे आपल्या ॲक्टिव्हा मोपेडने ध्वजारोहणासाठी शाळेत जात होते. बोंडेगाव ते कुर्झा रोडवरील राधाकृष्णनगरी जवळ पोहोचले असता, समोरून येणाऱ्या भरधाव ट्रॅक्टरने (क्र. MH-34-CD-7668) त्यांना जोरदार धडक दिली. ट्रॅक्टर चालक दुर्योधन गजानन तलमले (रा. भालेश्वर) हा आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर अत्यंत निष्काळजीपणे व भरधाव चालवत होता.

या धडकेत यशच्या मेंदूला गंभीर इजा झाली होती, तर रोनकच्या पायाला मोठी दुखापत झाली. अपघात घडल्यानंतर जखमींना मदत करण्याऐवजी आरोपी चालक ट्रॅक्टरसह घटनास्थळावरून पसार झाला होता.अपघातानंतर यश मेश्राम याला ब्रह्मपुरी येथील आस्था हॉस्पिटलमधील आयसीयू मध्ये दाखल करण्यात आले होते. गेली ४० दिवस तो मृत्यूशी झुंज देत होता. मात्र, ०६ मार्च रोजी त्याची ही झुंज अपयशी ठरली. एका उमद्या आणि शिस्तप्रिय एनसीसी विद्यार्थ्याचा असा अंत झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# राष्ट्रीय योग निसर्गोपचार शिबीर व संमेलन संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील भूवैकुंठ आत्मानुसंधान अड्याळ टेकडी आणि अखिल भारतीय प्राकृतिक




चिकित्सा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत '३ दिवसीय राष्ट्रीय स्वावलंबी योग निसर्गोपचार आणि साधना शिबीर' अत्यंत उत्साहात पार पडले. शिबिराचा शुभारंभ ६ मार्च रोजी संचालक सुबोध दादा यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ धनलाल शेंद्रे, डॉ प्रमोद माळवे, डॉ नवलाजी मुळे, सुश्री रेखाताई कार्याध्यक्ष अड्याळ टेकडी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी तुकाराम दादा यांच्या प्रतिमांचे दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी आरोग्य प्राप्तीसाठी योग आणि निसर्गोपचाराची अपरिहार्यता स्पष्ट केली. यानंतर सर्व शिबिरार्थींच्या परिचयानंतर आयोजित सामुदायिक प्रार्थना सत्रात अड्याळ टेकडीचे संचालक आदरणीय सुबोध दादा यांनी ब्रम्हमुहुर्त , प्राकृतिक चिकित्सेचे केंद्र म्हणजे गाव व राष्ट्रसंतांच्या 'ग्रामगीता' ग्रंथातील विचारांवर सर्वकष मार्गदर्शन केले. सोबतच अड्याळ टेकडीच्या कार्याची संक्षिप्त माहिती देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर शिबिरात चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, वर्धा, अमरावती, नांदेड, संभाजी नगर, पुणे, मुंबई, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, उडिसा, कलकत्ता (पश्चिम बंगाल) इत्यादी प्रांतातून १२५ प्रेमी सेवकांनी सहभाग घेतला.

शिबिराच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात ब्रह्ममुहूर्तावर सामुदायिक ध्यानाने व सूर्यदर्शनाने झाली. या सत्रात योगगुरू पंकज शुक्ला यांनी विविध योगासनांचे प्रशिक्षण देऊन व्याधी निवारणात योगाचे फायदे पटवून दिले. त्यानंतर निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. धनलाल शेंद्रे, डॉ. प्रमोद मालवी आणि डॉ. नारायण अंभोरे यांच्या उपस्थितीत नेती क्रिया, कुंजल क्रिया आणि धौती क्रिया यांसारख्या शुद्धीक्रियांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पार पडले. तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन करत शिबिरार्थींच्या शंकांचे निरसन केले. समारोपीय सत्रात डॉ शेंद्रे सर, डॉ प्रमोद माळवे सर, डॉ रमेश खोब्रागडे सर, डॉ. नवलजी मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपस्थित सर्व निसर्गोपचार तज्ज्ञांनी आपले विचार मांडले.

### विनोदिनी

पति ने अपनी पत्नी को बैंक की लाइन में खड़ा करवा दिया और खुद ऑफिस चला गया.... शाम को जब वापस आया तो...

पत्नी : दिनभर धूप में काउंटर पर खडे होकर जब नंबर आया तो कॅशियर बोला कि पैसे नहीं है....

पती : (गुस्से से) और तुम पागलों जैसी यूं ही आ गयी? उनका कुछ नहीं कर पाई? मुझ पर तो आज तक १५ बेलन तोड़ चुकी हो कम से कम एक बेलन उन पर तोड़ आती, उनको भी तो कुछ मालूम पड़ता..

पत्नी : (धीरज से) बेलन तो आज एक और टूटेगा! पैसा बैंक में नहीं, तुम्हारे खाते में नहीं था...!!!

# झाडीबोली प्रिमियर लीग स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

झाडीबोली साहित्य मंडळ शाखा-ब्रह्मपुरीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्ती पुरस्कार आणि झाडीबोली प्रिमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन ठाणेदार प्रमोद बानबले यांचे हस्ते झाले तर अध्यक्षस्थानी झाडीबोली साहित्य मंडळाचे केंद्रीय सदस्य ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर होते. ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व प्रसिद्ध कवी, लेखक डॉ धनराज खानोरकर, झाडीबोलीचे समीक्षक डॉ. संजयकुमार निंबेकर, प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, नगरसेवक राकेश पडोळे, झाडी बोली साहित्य मंडळाचे जिल्हा प्रमुख कवी अरूण झगडकर, गणेश कुंभारे, शाखाप्रमुख संतोष मेश्राम, सचिव धनंजय पोटे आदींची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. खानोरकर आणि डॉ. निंबेकर यांनी समयोचित विचार व्यक्त करून काव्य स्पर्धा आयोजनाबाबत शाखेचे कौतुक केले. मुल येथील प्रा. रत्नमाला भोयर यांच्या संत तुकाराम या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले तर गुलाब बिसेनद्वारा संपादित 'वायगावची बालकविता' संग्रहाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. प्रकाशित पुस्तकांवर अरूण झगडकर यांनी भाष्य केले. सूत्रसंचालन कवी लक्ष्मण खोब्रागडे यांनी केले तर आभार धनंजय पोटे यांनी मानले. जागतिक महिला दिनानिमित्त शाखेच्या वतीने प्रा. रत्नमाला भोयर (मुल), अर्चना खंडाते, कल्पना गेडाम, डॉ.विद्या शेळके (ब्रम्हपुरी), सविता धमगाये (नागपूर), उज्वला उसेंडी (कोरची), किरण चौधरी (गडचिरोली) इत्यादींना नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर झाडीबोली प्रिमियर लीग स्पर्धेचे पारितोषिक डॉ प्रवीण किलनाके , दिनेश कुमार अंबादे, डॉ.अलका दुधबुरे, अर्जूमन शेख, वृषाली चोरे, नीरज आत्राम, संजय बिसेन, मधुकर दुफारे, जगदीश मुनघाटे, सुनील बावणे आदींना प्रदान करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात राज्यस्तरीय कवी संमेलन 'झाडीचा फुलोरा'चे आयोजन प्रा.विनायक धानोरकरांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी हिरालाल पेंटर, प्रशांत भंडारे, डॉ. प्रवीण किलनाके, सुखदेव चौथाले, सुरेश डांगे, रामकृष्ण चनकापुरे, डॉ हितेंद्र धोटे, सुरेश सुरजुसे वर्धा, नरेंद्र गंधारे हिंगणघाट, संजय बिसेन, संजीव बोरकर, प्रकाश कोडापे, वृंदा पगडपल्लीवार, संगीता बांबोळे ,नत्थू चिमूरकर, प्रीती चहांदे, डॉ पद्माकर वानखेडे, सुरेश गेडाम, परमानंद तिराणिक, सोनाली सहारे, रोशनी दाते, सुजाता अवचट, ज्योत्स्ना बन्सोड, विधी बन्सोड, रंजना चुधरी, यामिनी मडावी, वंदना सोरते, अनुराग मुळे आदींनी आपल्या काव्य रचना प्रस्तुत केल्यात. तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या कवी-साहित्यिकांनी आपल्या कविता सादर करत रसिकांची दाद मिळवली. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाखाप्रमुख संतोष मेश्राम, सचिव धनंजय पोटे यांनी केले यासाठी साहित्य क्षेत्रात सगळीकडे त्यांचे कौतुक होत आहे.

# एलएमबी पब्लिक प्रि-स्कुलची शैक्षणिक सहल संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या प्रि-प्रायमरी विभागातील विद्यार्थ्याकरिता शैक्षणिक सहलीचे आयोजन





फॉरेस्ट गार्डन वडसा, देसाईगंज येथे करण्यात आले होते.

मुलांना निसर्ग सौदर्याचा उपभोग आणि परिसर ज्ञान सहलीच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करित असते. विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींची उत्सुकता असते. त्यापैकी एक म्हणजे शालेय सहल होय. सहलीच्या माध्यमातून तेथील ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व जाणून घेता येते. तसेच रोजच्या अभ्यासातून बाहेर पडून एक वेगळा अनुभव घेणे हा विद्यार्थ्यांना गरजेचे असते. निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित असे भव्य व रम्य सौंदर्य प्रत्यक्ष अनुभवणे आधुनिक शिक्षण पध्दतीमध्ये शैक्षणिक शालेय सहलीचे खुप महत्वाचे स्थान आहे. आजच्या जीवनामध्ये अभ्यासाबरोबरच करमणुकीची सुध्दा आवश्यकता आहे.

प्रवास आणि गोड गाणी हे सगळ अगदी मजेशीर वाटत असते. झाडांच्या दाट सावली बरोबरच विद्यार्थ्यांनी चेस बोर्ड, फोटोग्राफी हाल, आयुर्वेदिक उद्यान, प्राणी संग्रहालय, जार्गर्स पार्क, स्लाईड्स, झुले, रंगीबेरंगी फूले, डॉन्सींग कार, फिश, मनोरंजनाच्या साधनांचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

आयोजित सहलीच्या यशस्वीतेकरिता स्कूलच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले तसेच पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांची संपूर्ण सहली मध्ये उत्स्फूर्त सहभाग होता. सहलीला यशस्वीरित्या पार पाडण्यामध्ये प्रि-स्कूलच्या शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले.

# ब्रम्हपुरी योग समितीद्वारे जागतिक महिला दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'ब्रम्हपुरी योग समिती' च्या वतीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चांदगाव रोडवरील I.M.A. हॉल येथे सुरू असलेल्या डॉ. तरल नागमोती यांच्या योगा क्लासला समितीच्या सदस्यांनी भेट देऊन महिला शक्तीचा सन्मान केला.

योगाभ्यासासाठी उपस्थित असलेल्या सर्व योग साधिकांचा समितीच्या वतीने गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला आणि त्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. प्रसंगी डॉ. बाळकृष्ण शेळके मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राजू भागवत सर यांनी केले. सफलतार्थ संजय काकडे, गजाननजी बुरले, अनिल मुळे, जुमडे सर, कावळे सर, दोनाडकर सर यांनी सहकार्य केले

# शिवजयंतीनिमित्य मोफत आरोग्य तथा नेत्र तपासणी व रक्तदान शिबीर



ब्रम्हपुरी/का.प्र.

शिवसेना जनसंपर्क कार्यालय येथे शिवसेना तालुका व शहर च्या वतीने मोफत आरोग्य तथा नेत्र तपासणी,रक्तदान शिबिराचे आयोजन शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी करण्यात आले. शिवजयंती चे औचित्य साधून संपन्न झालेल्या या शिबिरास ब्रम्हपुरी येथील परिसरातील २३५ रुग्णांनी तपासणी करण्यात आली.

समता फाउंडेशन व शालिनीताई मेघे हॉस्पिटल व रिसर्च सेंटर वानाडोंगरी, नागपूर यांच्या संयुक्त विधमाने मोतीबिंदू नेत्र तपासणी घेण्यात आली या शिबिरात ११७ लोकांची तपासणी करण्यात आली असून त्यात निश्चित झालेल्या रुग्णाची मोफत शस्त्रक्रिया २० मार्च रोजी होणार आहे. लाईफ लाईन ब्लड सेंटर नागपूर च्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले त्यात २७ शिवसैनिक यांनी रक्तदान केले. तसेच आरोग्य तपासणी करिता मा.डॉ सुखदेवे मॅडम तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्फतीने मोफत रक्ततपासणी, उच्चरक्तदाब, सिकलसेल, तसेच शुगर तपासणी करण्यात आली तसेच निशुल्क आयुष्मान कार्ड,आभाकार्ड काढण्यात आले.

यावेळी आरोग्य तपासणी साठी तज्ञ् डॉक्टर यांच्या उपस्थितीत आरोग्य विषयक तपासण्या केल्या गेल्या या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अविनाश राऊत नगरसेवक, उदघाटक म्हणून प्रमोद बानबले साहेब, बबिता आमले महिला व बाल कल्याण सभापती, मोंटू पिलारे नगरसेवक, अनुकूल शेंडे नगरसेवक, सदानंद पाल, प्रशांत डांगे, मनोज रामटेके, गुड्डू तणेरवार, डॉ सागर माकडे उपस्थित होते. आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी संजय पारटवार उपजिल्हा प्रमुख ब्रम्हपुरी विधानसभा, नरेंद्र नरड तालुका प्रमुख, अमोल माकोडे शहर प्रमुख, उप तालुका प्रमुख कवळू पिंपळकर, सुरज माकडे, आकाश शेंद्रे युवासेना तालुका प्रमुख, सचिन भैरव, आकाश ऋषींया, लोकेश अंबादे, चेतन गुंजेकर,आशिष गांडलेवार, गणेश लांजेवार व इतर शिवसैनिक यांनी विशेष प्रयत्न केले.

# काँग्रेस विचारधारा न संपणारी - विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार

ब्रम्हपुरी/का.प्र.



काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नसून ती एक विचारधारा आहे. व्यक्ती येतात-जातात, परंतु काँग्रेसची विचारधारा कधीही संपणार नाही. काही नेते पक्ष सोडून इतर पक्षात जात असले तरी त्यामुळे काँग्रेसची ताकद कमी होत नाही. काँग्रेस पक्षाने देशाच्या विकासासाठी आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी ऐतिहासिक योगदान दिले आहे. आजही सामान्य जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याचे काम काँग्रेसच करत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कोणत्याही अफवा किंवा राजकीय घडामोडींमुळे खचून न जाता अधिक जोमाने संघटन मजबूत करण्यासाठी काम करावे, असे आवाहन विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.

चिमूर विधानसभा क्षेत्रातील काँग्रेसचे नेते सतीश वारजुरकर यांनी अलीकडेच भाजपमध्ये प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर ब्रम्हपुरी येथे काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. चिमूर विधानसभा क्षेत्रातील राजकीय परिस्थितीवरही या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी माजी न्यायमूर्ती चंद्रलाल मेश्राम, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, चिमुर विधानसभा अंतर्गत तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नेताजी मेश्राम, माजी जि.प.सदस्य डॉ.राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, नगराध्यक्ष योगेश मिसार, शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी पं.स.सदस्य डॉ.थानेश्वर कायरकर, युवक काँग्रेसचे अध्यक्ष सोनू नाकतोडे, जिल्हा काँग्रेस सचिव वासुभाऊ सोंदरकर, किसान काँग्रेस सेलचे तालुकाध्यक्ष वामन मिसार यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, काँग्रेस पक्ष मजबूत असून आगामी काळात संघटनेला आणखी बळकटी देण्यासाठी व्यापक पातळीवर काम केले जाईल.

या बैठकीला स्थानिक पदाधिकारी, माजी पदाधिकारी, युवक काँग्रेस व महिला काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी राजकीय रणनीती, संघटन विस्तार आणि जनतेच्या प्रश्नांवर आंदोलनात्मक भूमिका घेण्याबाबतही चर्चा करण्यात आली. बैठकीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून काँग्रेसची विचारधारा आणि संघटनात्मक ताकद कायम असल्याचा संदेश याप्रसंगी देण्यात आला.

# ३५ वर्षांच्या लोकसेवेनंतरही रोहितदास भूते मानधनापासून वंचित

## प्रकृती अस्वास्थामुळे संसाराचा गाडा ओढणे कठीण; शासकीय मदतीची प्रतिक्षा

नागभीड/प्रतिनिधी

गेल्या साडेतीन दशकांपासून आपल्या कलेच्या आणि वाणीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य करणारे नागभीड तालुक्यातील मौशी येथील ज्येष्ठ लोककलावंत रोहितदास जनार्धन भूते आज उतारवयात हलाखीचे जीवन जगत आहेत. वयाची ५५ वर्षे ओलांडल्यानंतर आणि प्रकृती साथ देत नसल्याने, 'कलेची सेवा करणाऱ्या या हातांना आता शासनाच्या मानधनाची जोड कधी मिळणार?' असा आर्त सवाल उपस्थित होत आहे.

सन १९९० पासून रोहितदास भूते यांनी ग्रामीण व तालुका स्तरावर लोककला, लोकसंगीत, नाट्य आणि साहित्याच्या माध्यमातून जनजागृतीचे मोठे कार्य केले आहे. केवळ मनोरंजनच नव्हे, तर केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, ग्रामस्वच्छता अभियान, आरोग्य शिबिरे आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी हिरिरीने सहभाग नोंदवून प्रशासनाला



मोलाची मदत केली आहे. चंद्रपूर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांतही त्यांनी आपल्या कलेचा ठसा उमटविला आहे. सध्या रोहितदास भूते यांचे वय ५६ वर्षे असून, वाढत्या वयानुसार त्यांना गंभीर आजारांनी ग्रासले आहे. पूर्वीप्रमाणे काबाडकष्ट करणे किंवा मोलमजुरी करणे आता त्यांना शारीरिकदृष्ट्या शक्य नाही. घरात उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे, मुलांचे शिक्षण आणि स्वतःच्या औषधोपचाराचा खर्च भागवणे त्यांच्यासाठी जिकिरीचे झाले आहे. आर्थिक विवंचनेमुळे संपूर्ण कुटुंब सध्या मोठ्या संकटात सापडले आहे.

महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनामार्फत ५० वर्षे पूर्ण झालेल्या वृद्ध कलावंतांसाठी 'वृद्ध कलावंत मानधन योजना' राबवली जाते. मात्र, अनेक वर्षांपासून कलेची सेवा करूनही भूते यांना अद्याप या योजनेचा लाभ मिळालेला नाही. अनेक पात्र कलावंत आजही प्रशासकीय उदासीनतेमुळे या मदतीपासून वंचित असल्याचे दिसून येत आहे.

**जल है तो कल है...**

# फादर ऑफ फार्मसी एम.एल. श्रॉफ यांची जयंती साजरी




ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी येथे दि. ६ मार्च २०२६ ला भारतीय औषध शास्त्राचे जनक एम.एल.श्रॉफ यांची १२४वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सचिन दुधे आणि रा.से.यो. अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन तसेच डॉ. सुहास साकरकर यांनी एम.एल.श्रॉफ यांनी भारतीय औषधी शास्त्र व गुणवत्तासाठी केलेल्या विशेष आणि अनमोल कार्याबद्दल आपले मत व्यक्त केले. तसेच प्रा.श्रीकांत महाजन यांनी डॉ.एम.एल.श्रॉफ हे कसे भारतीय औषधी अभ्यासक्रम सुरू करण्याचे जनक ठरले, त्यांनी औषनिर्माण शास्त्राचे विविध अभ्यासक्रम कोणत्या वर्षी सुरू केले याबद्दल सविस्तर माहिती दिली.

या वेळी डॉ. सुहास साकरकर डॉ. अनुप बारसागडे, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा.छगन डोईजड, प्रा.भूपेश भेंडारकर, प्रा.कू.पूजा घुटके, प्रा. चेतन चौधरी, प्रा.सविता वसाके, प्रा.कू.प्राची मांडवे, प्रा.कू.दिशा मुल, प्रा.देवाशीष भरणे, प्रा.प्रसंजित लांडगे, प्रा.कू.विजया सोनवणे, प्रा.अमिषा जयस्वाल, प्रा.राकेश तरारे, महेश मेश्राम, तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी एम.एल.श्रॉफ यांच्या प्रतिमचे पूजन मान्यवरांचे हस्ते पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभारप्रदर्शन रा.से.यो. अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांनी केले.

# महिला दिनानिमित्य विविध कर्तृत्ववान महिलांचा गौरव

ब्रम्हपुरी/का.प्र.




स्त्री शक्तीचा सन्मान आणि त्यांच्या कर्तृत्वाला दाद देण्यासाठी ब्रम्हपुरी शहरात 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा ब्रम्हपुरी सामाजिक एकता मंच तर्फे विशेष गौरव करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिल दोनाडकर, रवी चहांदे, सुरज मेश्राम, रवी पवार, विहार मेश्राम, मयुर चहांदे, मनोज धनवीज, सुनील साळवे व इतर सहकारी उपस्थित होते.

यावेळी महापुरुषांचा जीवनावर, त्यांच्या विचारावर आधारित पुस्तक, पुष्पगुच्छ, मिठाई अशा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने ब्रम्हपुरी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी माधुरी सलामे मॅडम, महिला पोलिस अधिकारी शीतल खोब्रागडे मॅडम व इतर महिला अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता.

# ब्रम्हपुरीत शिवसेना (उबाठा) पक्षातर्फे तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती 'फाल्गुन वद्य तृतीया'



या तिथीनुसार ब्रह्मपुरी शहरात ब्रम्हपुरी तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्षाच्या वतीने उपजिल्हाप्रमुख प्रा. अमृत नखाते व प्रा. ज्ञानेश्वर बगमारे यांच्या नेतृत्त्वात मोठ्या उत्साहात आणि भगव्या वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उभारलेल्या शामियानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी महाराजांच्या दैदीप्यमान इतिहासाचे स्मरण केले. या सोहळ्याला शिवसेना (उबाठा) चे उपजिल्हाप्रमुख प्रा. अमृत नखाते व प्रा. ज्ञानेश्वर बगमारे, शामराव भानारकर तालुका समन्वयक, इंजि. विक्रांत समर्थ उपतालुका प्रमुख, गणेश बागडे उप तालुका प्रमुख, सुमंत वैरागडे उपतालुका प्रमुख, लिलानंद ढोरे विभागप्रमुख, रमाकांत अरगेलवार एस.टी.कामगार सेना, तालुका संघटिका कुंदा कमाने, शहर संघटिका वैजांता प्रधान, जया कावळे उपतालुका संघटिका, प्रिया कमाने युतीसेना उपजिल्हा संघटिका दिपक नवघडे शहर समन्वयक, इंजि. भूषण रामटेके ब्रह्मपुरीचे शहर प्रमुख, धनीराम मेश्राम, गुलाब बागडे, शरद भानारकर, युवासेना पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपजिल्हाप्रमुख प्रा. अमृत नखाते म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजही आपल्याला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतात. तिथीनुसार शिवजयंती साजरी करणे ही आपली परंपरा असून, हिंदू संस्कृती आणि स्वराज्य रक्षकाचा हा उत्सव घराघरात पोहोचला पाहिजे.' असे मत व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज चौक संपूर्ण परिसर भगव्या झेंड्यांनी आणि तोरणांनी सजवण्यात आला होता. जयंतीनिमित्त अन्नदान सारख्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांची देखील लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी ब्रह्मपुरी परिसरातील नागरिक आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बँक ऑफ महाराष्ट्रची नान्होरी शाखा बंद करू नका

## तोरगांव/नान्होरी व्यापारी संघटनेच्या वतीने निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

बँक ऑफ महाराष्ट्र शाखा नान्होरी बँक बंद करू नये म्हणून तोरगाव/नान्होरी व्यापारी



संघटनेच्या वतीने झोनल मॅनेजर ब्रिजेश मिश्रा यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी उपस्थित सुधीर शिवरकर माजी उपसरपंच तथा धान्य व्यापारी तोरगाव बूज, मनोज हुमणे (सावकार) धान्य व्यापारी कोलारी, गजेंद्र राखडे अध्यक्ष से. सहकारी सोसायटी नान्होरी तथा धान्य व्यापारी नान्होरी, विनोद बुल्ले माजी सरपंच तथा धान्य व्यापारी बेलगांव, ईश्वर तुपट देऊळगाव, योगेश कुंभिलवार धान्य व्यापारी तोरगाव खुर्द, लीलानंद ढोरे सिव्हिल ठेकेदार नान्होरी, विवेक लुटे धान्य व्यापारी नान्होरी, विशाल राऊत धान्य व्यापारी तोरगाव बूज, सुभाष मिसार धान्य व्यापारी तोरगाव खुर्द हे प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी नान्होरी येथी महाराष्ट्र बँकेची शाखा बंद करू नये म्हणून साधक बाधक व सकारात्मक चर्चा करण्यात आली आणि जर का बँक बंद केली तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला. सोबत तोरगांव बूज, तोरगांव खुर्द, नान्होरी, नांदगाव, कन्हाळगाव, कालेता, बेलगांव, कोलारी ग्रामपंचायत चे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात बँकेची शाखा बंद केल्यास वृद्ध, स्त्री पुरुष, महिला बचत गट, व अन्य बँक खातेदारक यांचे खूप मोठे नुकसान व अडचण होणार आहे म्हणून नान्होरी येथील बँक ऑफ महाराष्ट्रची शाखा बंद करू नये ही विनंती करण्यात आली.

**... QUOTES ...**

"One of the lessons that I grew up with was to always stay true to yourself and never let what somebody else says distract you from your goals." -Michelle Obama

**चारोळी**

तो कळवळून म्हणाला प्रेयसीला -
'दिल्या घरी तू सुखी रहा'
ती म्हणाली, 'तू असं कसं बोलू शकतोस?
नंतरही तू मात्र कॉन्टॅक्ट मध्ये रहा...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# झाडूचा राजा अन् बाबांचे बाबा म्हणजे गाडगेबाबा

**- डॉ. धनराज खानोरकर**

ब्रह्मपुरी/

संत हे अनंत असतात.जगाचे आघात सोसून ते समाजाला दिशा देण्याचे काम करतात, त्यांना संत म्हणतात.असे समाजसंत गाडगेबाबा हे एकमेव बाबांचे बाबा आहेत की,ज्यांनी झाडू हे शस्त्र मानून स्वच्छतेचा मंत्र दिला.भोंदू बाबांचा पर्दाफाश केला.शिक्षणाचे माहात्म्य आणि माणसाचे कर्म यावर कीर्तनाच्या माध्यमातून विचार पेरले, त्यामुळे खरा झाडूचा राजा अन् बाबांचा बाबा गाडगेबाबा होय,असे काव्यमय मार्मिक विवेचन प्रसिद्ध कवी लेखक डॉ धनराज खानोरकरांनी व्यक्त केले.ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'संत गाडगेबाबा : व्यक्ती व विचार' विषयावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ युवराज मेश्राम उपस्थित होते. गाडगेबाबांकडून मानवी स्वच्छता व पर्यावरण स्वच्छता, शिक्षणाची आवश्यकता शिकण्यासारखे आहे, असे अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ शेकोकरांनी सांगितले. संचालन व आभार जगदिश गुरनुलेंनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्ञानदिप प्रशासकीय महाविद्यालयात जागतिक महिला दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ज्ञानदीप प्रशासकीय महाविद्यालय चौगान ता. ब्रम्हपुरी येथे जागतिक महिला दिन हा कार्यक्रम खूप उत्साहाने आणि आनंदाने पार पडला. कार्यक्रमांमध्ये उपविभागीय अधिकारी मॅडम यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. सोबतच महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचारी यांना सुद्धा सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गुणगौरव करण्यात आलेला होता.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्वणी पाटील मॅडम उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांचे मार्गदर्शन लाभले. सोबतच निहाटे सर व महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी यांनी जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये उत्तुंग भरारी घेणाऱ्या महिलांच्या विचारावर आणि कार्यांवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे संचालन खुशी सहारे तर आभार प्रदर्शन रिया मेश्राम या विद्यार्थिनींनी केला. प्रसंगी महाविद्यालयीन शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# लग्नाळू तरूणांच्या...

(पान क्र. ७ वरून)

आणि राजकारण्यांच्या ताब्यात असल्याचे चित्र आहे. मीडिया केवळ राजकीय चिखलफेक आणि अक्कलशून्य विषयांवर चर्चा करण्यात मग्न आहे. मूळ प्रश्न जसे की, बेरोजगारी आणि वैफल्य, तरुणांची वाढती व्यसनाधीनता, वाढत्या आत्महत्या, सामाजिक आणि आर्थिक विषमता या मूलभूत प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप तज्ज्ञांकडून केला जात आहे.

विवाह न होणे आणि आर्थिक असुरक्षितता यामुळे तरुणांमध्ये मानसिक विकृती, अनैसर्गिक संबंध आणि बेजबाबदारपणा वाढत आहे. 'वंशसातत्य' ही निसर्गाची मूलभूत गरज असली, तरी हजारो तरुण 'निर्वंश' होण्याच्या मार्गावर आहेत, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. सत्तेतील नेते मात्र धार्मिक अस्मिता, जातीचे राजकारण आणि सत्ता बळकावण्याच्या खेळात व्यस्त आहेत. नव्या समस्यांचा महापूर उंबरठ्यावर उभा आहे. जर आताच धोरणात्मक बदल करून तरुणांना सन्मानाने जगण्याची आणि रोजगाराची संधी दिली नाही, तर देशाचे भविष्य अंधकारमय असेल. ही वेळ केवळ विचार करण्याची नाही, तर ठोस कृती करण्याची आहे.

# एलएमबी स्कुलचे विद्यार्थी Resonance Award ने सन्मानित

ब्रम्हपुरी/का. प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये १४ सप्टेंबर २०२५ ला Reso-vista (An Interstate School level Scholarship Examination) चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. त्यानिमित्य बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.



इयत्ता नववीतील व्रतेश वसाके हा Zonal 1st Topper, City's Topper and School's Topper असून त्याचे ९९.९११ श्रेणी प्राप्त केली व बक्षीस म्हणून Bicycle व Gold Medal मिळवले. त्याचप्रमाणे इयत्ता दहावीतील इशान्वी कावळे ही Zonal 2nd Topper, City's 2nd Topper and School's 2nd Topper असून हीने ९९.९०३ श्रेणी प्राप्त केली व बक्षीस म्हणून smart watch and gold medal मिळवले. तसेच इयत्ता नववीतील आभास रामटेके हा Zonal 2nd Topper, City's 2nd Topper and School's 2nd Topper त्याने ९९.८५१ श्रेणी प्राप्त केली व बक्षीस म्हणून smart watch and silver medal मिळवले.

बक्षीस वितरण सोहळा हा स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र, मेडल व विशेष बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य कुरेशी सर, उपप्राचार्य राठी मॅडम, पर्यवेक्षिका झोडे मॅडम यांचेसह शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.





# भाजप नगरसेवकांनी केलेले आरोप...

(पान क्र. १ वरून)

देण्यात आली. पावसाळ्यात शहरात पाणी साचू नये, परिसर स्वच्छ राहावा आणि नागरिकांना निरोगी वातावरण मिळावे यासाठी या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे भाजपने दिलेली आकडेवारी चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांनी केला होता.

दरम्यान, शहरातील मोकळ्या जागांचे सुशोभीकरण व सौंदर्यीकरण करण्यासाठी १ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. मागील प्रशासकीय कालावधीत चुकीच्या सार्वजनिक जागेची निवड करून २७ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. त्यामुळे सदर कामे थांबवून उर्वरित १ कोटी ४५ लाख रुपये योग्य जागेची निवड करून खर्च करण्याचा ठराव घेण्यात आला आहे. त्यामुळे यावर्षी या हेडवर स्वतंत्र तरतूद दाखविण्यात आलेली नाही. तसेच शहरातील सर्व खुल्या जागांचे सौंदर्यीकरण करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले असल्याची माहिती सत्ताधाऱ्यांनी दिली.

अर्थसंकल्प तयार करताना नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सुविधा यांना विशेष प्राधान्य देण्यात आले असून शहर स्वच्छ, सुंदर आणि राहण्यायोग्य बनवण्यासाठी विविध योजनांची आखणी करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. एखाद्या विकासकामासाठी निधी अपुरा पडल्यास किंवा नवीन कामांची गरज निर्माण झाल्यास पुरवणी अंदाजपत्रकाद्वारे निधी उपलब्ध करून दिला जातो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय काही वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेली झोन बदलाबाबतची बातमी ही वस्तुस्थितीपासून दूर असून हेतुपुरस्सर प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. ब्रम्हपुरी शहराची वाढती लोकसंख्या आणि शहर विकासाच्या दृष्टीने अशा प्रकारचे ठराव आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

संबंधित शेतकऱ्याच्या अर्जाच्या आधारे शेती झोनमधील जागेवर शेती करणे कठीण होत असल्याने त्या जागेवरील आरक्षण वगळून रहिवासी वापरात समाविष्ट करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला होता. ही प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये करण्यात येते. या प्रक्रियेत कोणताही आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप पूर्णपणे खोटा व निराधार असल्याचे सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट केले. तसेच संबंधित बातमीत करण्यात आलेला 'गुंठेवारी'चा उल्लेखही चुकीचा असल्याचे त्यांनी सांगितले.

अपूर्ण किंवा चुकीच्या बातम्यांमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, असे आवाहनही नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले. ब्रम्हपुरी शहराचा सर्वांगीण विकास हा नगरपरिषदेचा मुख्य उद्देश असून त्यासाठी सत्ताधारी कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या पत्रकार परिषदेला नगराध्यक्ष योगेश मिसार, उपाध्यक्ष डॉ. नितीन उराडे यांच्यासह बहुसंख्य नगरसेवक उपस्थित होते.

# शारदा कॉलनीत जागतिक महिला दिन संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक महिला दिनानिमित्त दि.८ मार्चला शारदा कॉलनी ब्रम्हपुरी येथील महिलांनी सावित्रीबाई फुलेंच्या सन्मानार्थ महिलादिन मोठ्या उत्साहात साजरा केला. प्रासंगी मालुताई सुपले, शांती सिंग व पुष्पा वुडू हयाच्या हस्ते दिप प्रज्वलन करून सावित्रीबाई फुलेंच्या फोटोला हार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमाअंतर्गत संचालिका मंजूषा बजाज हयांनी सावित्रीबाईच्या जीवनावर प्रकाश टाकून महिला दिनाचे महत्त्व सांगितले. त्यानंतर डॉ. आश्लेषा छाजेड (पाटणकर), कु. अदिती राय (नागपूर), निलम चहाण व शितले जगनाडे यांनी जागतिक महिला दिनाविषयी आपआपले मनोगत व्यक्त केले. तसेच श्रीमती मालतीलाई सुपले व स्नेहा महाजन यांनी सुरेख गीत गाऊन महिलांच्या कर्तृत्वाची गाथा सादर केली.

शेवटी आभार प्रदर्शनात विजया पाटणकर यांनी स्त्री रंगाचे विविध पैलू कविता रूपाने सादर करून सर्वांना महिल दिनाच्या शुभेच्छा दिल्या व त्यांचे अभिनंदन करून आभार मानले.

# दोन अल्पवयीन मुलींचे...

(पान क्र. १ वरून)

तरुणाने तिला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार वडिलांनी दाखल केली आहे.

दुसरी घटना ९ मार्च रोजी समोर आली. १७ वर्षांची ही मुलगी बारावीच्या वर्गात शिकत असून तिचा इतिहासाचा पेपर होता. सकाळी ११ वाजता ती परीक्षेसाठी घरातून निघाली, पण सायंकाळपर्यंत घरी पोहोचली नाही. कॉलेजमध्ये चौकशी केली असता, तिने दुपारी मैत्रिणीसोबत जेवण केल्याचे समजले. एका मैत्रिणीने तिला संध्याकाळी ६ वाजता कॉलेजच्या गेटवर पाहिले होते, मात्र त्यानंतर ती बेपत्ता झाली. शोध मोहिमेदरम्यान तिची सायकल कॉलेज परिसरातच आढळून आली आहे. या प्रकरणातही मुलीला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत पालकांनी पोलिसांत धाव घेतली आहे. एकापाठोपाठ एक अशा दोन मुली बेपत्ता झाल्याने ब्रह्मपुरी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पोलिसांनी दोन्ही प्रकरणांत गुन्हे दाखल केले असून संशयितांचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत.

बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404